सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**

एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,

E-MAIL ID – lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

**प्रेस नोट क्र. ०४** **दिनांक :- २१/०२/२०२३**

## स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी पडघा येथील फ्रिज चोरीचा गुन्हा उघडकीस करुन आरोपीतांना केले अटक

मा. श्री. डॉ. डी. एस. स्वामी, पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती डॉ. दिपाली धाटे, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रा मधील दाखल मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणणे कामी व त्यास प्रतिबंध करणेकामी सुचना दिलेल्या होत्या त्यानुसार श्री. सुरेश मनोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी जिल्हयात मालमत्तेचे दाखल गुन्हे उघडकीस आणणेकामी वेग-वेगळे पथक तयार करुन त्यांना मार्गदर्श केले.

पडघा पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्र. I २२/२०२४ भादविसह कलम २७९ प्रमाणे दाखल गुन्हयांत अज्ञात आरोपीतांनी लहान मोठे आकाराचे एकुण ३५ फ्रिज व एक कंटेनर ट्रक सह दिनांक १२/१०/२०२४ ते दिनांक १३/०१/२०२४ चे मध्यरात्री चोरुन घेवुन गेले होत. सदर गुन्हयांचा समांतर तपास वरिष्ठांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण सुरु होतो समांतर तपासा दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे व सीसीटिव्ही फुटेजच्या आधारे आरोपीत हे भिवंडी व छत्रपती संभाजी नगर येथील असल्याचे समजले. त्या आधारे आरोपीत अमिर इसाक शेख वय ३१ वर्षे राहणार हरसुल छत्रपती संभाजी नगर यास ताब्यात घेवुन गुन्हयाचे अनुशंगाने विचारपुस केली असता त्याने वरील गुन्हयातील माल घेतल्याची कबुली दिली व त्याच्याकडुन सदर गुन्हयात चोरीस गेलेल्या फ्रिज पैकी २० फ्रिज ३,२७,१४३/- रु किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला व त्याचे कडुन गुन्हयांतील इतर आरोपीतांचे नावे निष्पन्न करुन सदर गुन्हयांत १) अमिर इसाक शेख वय ३१ वर्षे राहणार हरसुल छत्रपती संभाजी नगर २) रोशनअली अबिदअली खान वय ३४ वर्षे रा. डोंगरपाडा, चाविद्रां ता. भिवंडी जि. ठाणे ३) रामचंद्र किसन भांडारवार उर्फ राम वय ३० वर्षे रा. पद्मानगर नारपोली, भिवंडी यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक, श्री. डी. एस. स्वामी तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक, श्रीमती दिपाली धाटे यांनी दिलेल्या आदेश व सुचना प्रमाणे श्री. सुरेश मनोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वाशिंद युनिट मधील सपोनि/भास्कर जाधव, पोलीस उप निरीक्षक/कदम, पोहवा/१२३७ सुनिल कदम, पोहवा/१५४२ उमेश ठाकरे, पोहवा/२६७ हनुमान गायकर, पोहवा/७५६ गोविंद कोळी, या पथकाने कौशल्यपुर्ण उल्लेखनिय कामगिरी केली आहे. सदर गुन्हयांचा पुढील तपास पोहवा/१२३७ सुनिल कदम नेमणुक-स्थागुशा हे करीत आहे.

******************************************************************